# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


**पूरक परिपत्रक**

**क्रमांक:** २अ/एडीएम/जा वै प्रमाणपत्र/२०१८/ ११६६
**दिनांक: ३१.८.२०१८**

**विषय:-** शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित उमेदवारांचे विहित मुदतीतील जात वैधता व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्राबाबत...

संदर्भ:- १) या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २अ/एडीएम/जा वै प्रमाणपत्र/ २०१८/ ११६६, दिनांक ३१.८.२०१८

२) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे पत्र क्र.सीईटी सेल/तंत्र/जात वैधता/२०१८/१२३४ दि.३१.८.२०१८

संदर्भिय परिपत्रकातील मुद्दा २ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता ज्या विद्यार्थ्यांनी संबंधित मागासवर्गीय प्रवर्गातुन अर्ज सादर केला होता व त्यांना गुणवत्तेने General Open/All India/TFWS/Defence/Minority seat/ PWD seat या जागेवर प्रवेश मिळाला परंतु, जात वैधता व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठीच्या निर्धारीत अंतिम दिनांकापर्यंत संबंधित प्राधिकरणाने निर्गमित केलेले जात वैधता व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र विद्यार्थ्यांने सादर केले नाही, अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश संबंधित संस्थेने कॅटेगरी कन्व्हेंशन फी रक्कम रु. २००/- (रक्कम रु. दोनशे फक्त) आकारुन खुल्या प्रवर्गामध्ये बदल करण्यात यावा व तसे संबंधित विद्यार्थ्यांस लेखी निदर्शनास आणावे असे कळविलेले आहे.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने वरील संदर्भ क्रमांक २ चे पत्रान्वये कळविल्यानुसार **सदर कार्यवाही करताना " अशा विद्यार्थ्यांना मागासवर्गीय प्रवर्गासाठीची कोणतीही शासकीय सवलत अनुज्ञेय राहणार नाही " असे हमीपत्र संस्थांनी विद्यार्थ्यांकडून घ्यावे.**

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत:- **माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपुर, नाशिक, पुणे यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्रक आपल्या विभागाच्या अधिनस्त सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात यावे.
२. कार्यासन क्रमांक ३,(माहिती तंत्रज्ञान शाखा), मुख्य कार्यालय, मुंबई .